IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

# भारतातील सामाजिक सुधारणांमध्ये लोकहितवादींचे योगदान-एक अभ्यास

प्रा. नागोराव तारू

इतिहास विभाग के. एम. सी. महाविद्यालय, खोपोली, खालापूर, रायगड

nagoraotaru@gmail.com

**सारांश:**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाततथा जडणघडणीत ज्या अनेक समाजसुधारकांचे घेतले जाते, त्यातगोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांना विशेष महत्त्वाचे स्थान आहे.पेशव्यांच्या ऱ्हासानंतर हे व्यक्तिमत्त्व उदयाला आले. हे व्यक्तिमत्त्व विलक्षण व मनस्वी होते. विद्यार्थी दशेत ते खोलीच्या एका कोनाड्यात बसून पुस्तक वाचत होते. यावनी पुस्तकाचा घरात विटाळ होतो म्हणून विहिरीवर आंघोळ करून घरात येत होते. अंध:श्रद्धेचे स्तोम माजविणाऱ्या पुराणातील भाकड कथांवर त्यांनी हल्लाबोल केला.आपल्या वाड्यात त्यांनी लोकांसाठी मोफत दवाखाना चालविला. असे समाजसुधारक लोकहितवादी यांनी ब्रिटिशांची नोकरी व देशाचे हित यांच्यामध्ये भांडण होऊ न देता, त्यांनी समाजसेवेचे अफाट कार्ये केले, त्याचाच एक मागोवा येथे घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**बीज शब्द :** परिचय, समाज सुधारणावादी कार्ये, साहित्यकृती, वृत्तपत्र कार्ये

समाजाच्या उन्नतीसाठी आपले संपूर्ण जीवन संपवणाऱ्या, ध्येयाने प्रेरित होणाऱ्या समाजसुधारकांमध्ये लोकाहीतावादिंचा समावेश होतो. त्यांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. इतिहास स्पष्ट करतो की, महाराष्ट्रामध्ये सामाजिक सुधारणांची चळवळ रुजविण्यामध्ये लोकहितवादी यांच्या साहित्य, लेखणी व वाणीने जे कष्ट घेतले ते अविष्मरणीय आहेत. हे आपण प्रथमतः समजून आणि उमजून घेतले पाहिजे. या समाजसुधारकाने मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारची साहित्य निर्मिती केली. मराठी सारस्वतात नाव कमावले. अनेक प्रश्नांचा अनेक मार्गांनी उघड उघड स्पष्ट विचार केला. अशा व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणे उल्लेखनीय ठरते.

गोपाळ हरी देशमुख हे लोकहितवादी या नावाने सर्वांना परिचित आहेत. पेशव्यांच्यादरबारात अनेक देशमुख घराणी कामास होती. त्यात एका देशमुख घराण्यात लोकहितवादींचा जन्म झाला. लोकहितवादी हे तसे उच्च इंग्रजी विद्याविभूषित होते. त्यांनी इंग्रजी शिक्षण घेतले होते. उत्तर पेशवाईच्या काळात महाराष्ट्रात मोठी खळबळ माजली होती, ती त्यांनी आपल्या उघड्या डोळ्यांनी पहिली होती. स्वकीयांमध्ये असणारा तीव्र दोष यांचा त्यांनी जवळून अनुभव घेतला होता. त्यामुळेच त्यांच्यात मोठे परिवर्तन घडून आले. इंग्रजी राजवटींचाही त्यांना जवळून अनुभव आला. स्वकीय व परकीय यांच्यातील त्यांना तुलना करणे त्यांना जमले. तुलनेत इंग्रजी राजवट सुखकारक वाटली.सुधारणावादी वाटली. कारण इंग्रजी संस्कृतीत भारतीय संस्कृतीत असणारी भेदग्रस्ततादिसून आली नाही. त्यामुळे ब्रिटिशांच्या राजवटीत असणारी शिस्त, व्यवस्थापन, कार्यक्षमता इत्यादींचा त्यांना मोठा अभिमान वाटे. ब्रिटिशांची राजवट त्यांच्या दृष्टीने इच्छापुर्तीची होती, असे आपणास म्हणावे लागेल.

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

लोकहितवादींनी'प्रभाकर' नावाच्या वृत्तपत्रातून जवळपास १०८ पत्रे लिहिली. याच पत्रांना आपण लोकहितवादींची शतपत्रे असे म्हणतो. म्हणजेलोकहितवादींची शंभर पत्रे असा त्यांचा उल्लेख करतो. या पत्रांच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विषयांवर मोठ्या प्रमाणावर प्रकाश टाकला. ही त्यांची उल्लेखनीय कामगिरी होय. "समाजाविषयीविलक्षण आत्मीयता, सुधारणेविषयी तळमळ, विवेचक बुद्धी, परखडपणा ही त्या शतपत्रांची वैशिष्ट्ये होत."१लोकहितवादीना यांच्या माध्यमातून कोणताही स्वार्थ साधायचा नव्हता. म्हणूनच कोण काय म्हणेल, काय होईल याची त्यांनी कधी तमा बाळगली नाही. प्रामाणिकपणे आपले कार्य करून ते राहिले. आणि हाच खरा गुणधर्म होय समाजसुधारकाचा.

शिक्षण, व्यापार – उद्योग यासारख्या सुधारणावादी बाबींना त्यांनी अव्याहतपणे महत्त्व दिले. कारण याच बाबी तत्कालीन समाजाला प्रेरणादायी होत्या. विकासाकडे झेप घेणाऱ्या होत्या. आणि त्या काळातील समाजाला अशा गोष्टीकडे लक्ष देणे अतिशय गरजेचे होते. त्यातच त्यांचे द्योतक सामावले होते. शेतीच्या क्षेत्रात अखेर होत असताना आपल्या संस्कृतीला त्यांनी उद्योग संस्कृतीचा मोलाचा संदेश दिला.कारण हीच संस्कृती पुढे घेऊन जाणारी होती.

मानवाने या पृथ्वी तलावर धर्म, जाती, संस्कृती या गोष्टी स्वार्थासाठी मोठ्या हिरहिरीने निर्माण केल्या. या गोष्टींना बाजूला सारून मानवाने आपले समाजाचे हित साधले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या वर्ण व्यवस्था समाजासाठी बाधक आहेत, असा त्यांचा विचार होता. या गोष्टीचे आश्चर्य यासाठी वाटते की, ते स्वतः ब्राह्मण होते. तरीही त्यांनी या समाजाच्या विषमतावादी तत्त्वांना दूर सारण्याचा प्रयत्न केला. जातीयवादी वर्तणुकीवर कडाडून टीका केली. स्त्रियांशी निर्गृह्लन वागण्याची पद्धती याचा त्यांनी निषेध केला.

राजकीय क्षेत्रात त्यांचे विचार अतुलनीय आहेत. त्यांना वाटत होते की, आपल्या भारतीय लोकांनी ब्रिटिशांच्या राजवटीचा फायदा करून घ्यावा, व त्याच्या माध्यमातून लोकांनी सुधारावे व एक छान अशी पार्लमेंट भारतीयांना मिळावी. ते कित्येकदा तसे म्हणतही असत. आपली सुरी, कात्री आपणच बनवायला पाहिजे. अशी त्यांची घोषणा होती. म्हणजे याचा अर्थ असा आहे की, आपल्या स्वदेशी वस्तू आपणच बनवल्या पाहिजेत. व आपणच वापरल्या पाहिजेत. परदेशी माल न वापरता स्वदेशी माल वापरावा, अशी त्या पाठीमागची त्यांची भूमिका होती.

लोकहितवादींची समाजसुधारणा विषयी भूमिका साहित्यातून साकार झाली. लक्ष्मीज्ञान, ग्रामरचना, स्वाध्याय, कलियुग, गुजरात देशाचा इतिहास, उदेपूरचा इतिहास, पृथ्वीराज चव्हाण याचा इतिहास, पं. स्वामी श्रीमद्दयानंदसरस्वती, हिंदुस्थानास दरिद्रता येण्याची कारणे, आगमप्रकाश, ऐतिहासिक गोष्टी यासारख्याग्रंथातून समाजाचे यथार्थ चित्रण त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आज ही त्यांची साहित्यकृती दुर्मिळ झालेली आपणास दिसून येते.२

व्यवसायाच्या निमित्ताने लोकहितवादी कधी महाराष्ट्रात तर कधी महाराष्ट्राच्या बाहेर फिरायचे. कधी गुजरात राज्यात जायचे. ते ज्या ज्या ठिकाणी गेले, संचार केले त्या त्या ठिकाणी असणाऱ्या संस्कृतीशी ते समरस झाले. समाज जीवनाशी ते मिळते जुळते झाले."समाजाला उद्युक्त करण्यासाठी त्यांनी कित्येक ठिकाणी शाळांची तसेच वाचनालयांची निर्मिती त्यांनी केली. पुण्याच्या नगर वाचन मंदिराच्या स्थापनेत त्यांचा मोठा सिंहाचा वाटा

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
IJARSCT
Impact Factor: 7.53
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Volume 4, Issue 3, March 2024

होता. पहिले मराठी साहित्य संमेलन जे भरले ते त्यांच्याच कष्टाने. ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश यासारख्या वृत्तपत्रामागे त्यांचीच मोठी प्रेरणा होती.अनेक शैक्षणिक व सामाजिक कार्यक्रमांना त्यांनी उत्सुफुर्तपणे चालना दिली."[३]

लोकहितवादींनी स्त्रियांचे सामाजिक स्थान, बालविवाह, विधवांचा पुनर्विवाह, परदेश गमन यासारख्या गोष्टींकडे लक्ष देऊन एक रचनात्मक दृष्टी ठेवली व साकारली. स्त्रियांचे स्थान पुरुषांच्या समान असले पाहिजे, बालविवाह अनेक दृष्टीने त्याज्य असून त्या ऐवजी जुनी स्वंयवरपद्धतीच सुरु कारणे उचित आहे. असे ते मानीत होते. ब्राह्मणांची जात परदेशात गेल्याने बुडते, असे नाही. असे त्यांचे विचार होते.[४]

पाश्चात्यांची संस्कृतीच्या संपर्काने जे स्वतःचे दर्शन ध्येयवादी शिक्षितांच्या प्रथम पिढीला झाले, ते मोठे सत्य आहे. हे फार कटू सत्य असते. भ्रष्ट स्वरूपच शत्रूच्या ठिकाणी मानून परकीय सत्तेशी करावयाची स्वातंत्र्याची लढाई सुद्धा त्यांना लढता येणार होती. माणसाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक शक्तीच्या उत्कर्षाला माणसाचे अंतीम कल्याण साधते. हे भारतीय समाजाने शिक्ष केली पाहिजे, असेही त्यांचे म्हणणे होते.[५]

**निष्कर्ष:**

१) लोकहितवादीनी समाजसुधारणावादी साहित्य निर्मिती केली.
२) लोकहितवादी ध्येयनिष्ठ समाजसुधारक होते.
३)लोकहितवादीनी स्वतः ब्राह्मण असूनही ब्राह्मणी वर्चस्वाला सुरुंग लावण्याचे काम केले.
४)लोकहितवादी स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते.
५)लोकहितवादीनी धर्माचा खरा अर्थ सांगण्याचा प्रयत्न केला.

**संदर्भ – तळटीपा**

१) उपाध्येशशिकला,महाराष्ट्र दर्शन, व्यक्ती दर्शन, खंड – ५, अतुल बुक एजन्सी प्रकाशन, पुणे, प्रकाशन आवृत्ती : १९८६, पृ. क्र.– ९.
२) कित्ता,पृ. क्र. – ९.
३) फडकुले निर्मलकुमार, नसिराबादकर ल. रा., निवडक लोकहितवादी, फडके बुकसेलर्स, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती: जुलै, १९८९,पृ. क्र. – ३.
४) पारीख गोवर्धन, लोकहितवादी(गोपाळराव हरि देशमुख), मौज प्रकाशन गृह, मुंबई, पहिली आवृत्ती : मार्च, १९७१,पृ. क्र. – २३.
५) वैद्य सरोजिनी, गोपाळराव हरी (लोकहितवादी), सुपर्ण प्रकाशन, पुणे,पृ. क्र. – ५६.

ISSN 2581-9429 IJARSCT
Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in